जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ 6611 /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- 28/05/२०२४

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश.**

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने ३५-बारामती लोकसभा मतदार संघासाठी दिनांक ०७/०५/२०२४ रोजी व ३४-पुणे लोकसभा मतदार संघासाठी दिनांक १३/०५/२०२४ रोजी मतदान झालेले आहे. या दोन्ही लोकसभा मतदार संघांची मतमोजणी दिनांक ०४/०६/२०२४ रोजी पुणे शहर आयुक्तालय हद्दीत " धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे " येथे होणार आहे. सदर मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पडण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखणेकामी, सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी " धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे" येथील २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे, येथील २०० मीटर परिसरात दिनांक ०४/०६/२०२४ चे ००.०१ वा. पासून ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे निर्बंध घालण्यात येत आहेत.

१) मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनधिकृत हत्यारे तसेच परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.
सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकिय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना ) लागु राहणार नाही. तसेच ज्या परवाना धारकास रुढीप्रमाणे बंदूक प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.

२) मतमोजणीच्या परिसरात मोबाईल, लॅपटॉप, आयपॅड, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे तसेच मॅचबॉक्स वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही.)

३) मतमोजणीच्या परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकूर लिहण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

६) मतमोजणीच्या परिसरात पास शिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दि. ०४/०६/२०२४ रोजी विजयी मिरवणूका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.२४/०५/२०२४ रोजी दिला आहे.

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- २४/०५/२०२४

**प्रत सविनय सादर :-**

१.मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई
२.मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३.मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४.मा.पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर

**प्रत :- सस्नेह अग्रेषीत :-**

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. मा.आयुक्त महानगरपालिका,पुणे
३. मा.जिल्हा सत्र न्यायाधीश, पुणे
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
५. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (पुणे व बारामती)

**प्रत :-**

१. अपर पोलीस आयुक्त, प्रशासन /गुन्हे /पुर्व व पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर
२. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १,२,३,४ व ५ पुणे शहर
३. सहाय्यक पोलीस आयुक्त, व वाहतुक शाखा पुणे शहर
४. विधी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
५. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे. २/- या आदेशाची स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.
६. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. २/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.
७. पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.

Scanned with OKEN Scanner